दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

● वर्ष १६ वे ● अंक ८४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१७ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# मुंबईत सेना भवनासमोर राडा

## भाजपच्या 'फटकार'वर शिवसैनिकांचे 'फटकारे'

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**सत्ता वाटपाच्या वादातून युती तुटल्यानंतर एकमेकांपासून दुरावलेले शिवसेना व भाजपचे कार्यकर्ते आज मुंबईत प्रथमच समोरासमोर आले. भाजपच्या युवा मोर्चानं शिवसेना भवनासमोर काढलेल्या 'फटकार' मोर्चामुळं दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांमध्ये वादाची ठिगणी पडली. त्यातून शिवसैनिकांनी भाजपच्या काही कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचं समोर येत आहे. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यानं पुढील अनर्थ टळला. मात्र, या घटनेमुळं दादरमध्ये तणाव असून पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.**



अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीसाठी जमीन खरेदी करताना गैरव्यवहार झाल्याची चर्चा आहे. त्यावरून विरोधकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह भाजपवर टीकेचा भडिमार सुरू केला आहे. शिवसेनेनंही यावरून भाजपवर निशाणा साधत चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळं संतापलेल्या

अयोध्येत श्री राम मंदिर बांधण्यासाठी भूसंपादनाबाबत खोटे आणि बनावट आरोप करून शिवसेनेने हिंदू धर्म, धार्मिक स्थळ आणि रामभक्तांच्या श्रद्धेचा अपमान केला आहे. शिवसेनेच्या या राजकीय षडयंत्राविरोधात भाजपा युवा मोर्चाने फटकार मोर्चाचं आयोजन केले होते. याच्या विरोधात निषेध करण्यासाठी शिवसेना भवनासमोर जमण्याचं आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात आलं होतं.

अयोध्येतील राममंदिर उभारणीचे काम आणि त्यामागचा व्यवहार पारदर्शक, प्रामाणिक पद्धतीने व्हावा. रामभक्तांच्या श्रद्धेस तडा जाईल असे काही घडू नये ही अपेक्षा असतानाच जमीन व्यवहाराचे संशयास्पद प्रकरण समोर आले. ते खरे की खोटे याचा लगेच खुलासा झाला तर बरे! राममंदिर कार्य हे राष्ट्रीय अस्मितेचे कार्य आहे. या कार्याची कोणी जाणीवपूर्वक बदनामी करत असेल तर त्यांच्यावरही कारवाई होणे गरजेचे आहे. अयोध्येतील राममंदिर हे रामभक्तांचा त्याग, संघर्ष व बलिदानातून उभे राहिले. हाच इतिहास आहे. एखाद्या घोटाळ्याचा डाग त्या मंदिरावर पडत असेल तर पंतप्रधान मोदी, सरसंघचालक भागवतांना त्यात हस्तक्षेप करावाच लागेल, असा सल्ला शिवसेनेने दिला होता.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा निषेध करण्यासाठी दादर येथील शिवसेना भवनासमोर 'फटकार मोर्चा'चं आयोजन केलं होतं. भाजप युवा मोर्चाचे मुंबई अध्यक्ष तेजिंदरसिंग तिवाना यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाची माहिती मिळाल्यानं शिवसैनिक आधीच शिवसेना भवनासमोर जमले होते. संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी पोलिसांनीही जय्यत तयारी केली होती. भाजपचा मोर्चा शिवसेना भवनापासून बऱ्याच दूर अंतरावर अडवण्यात आला. भाजपचे कार्यकर्ते शिव-सेना भवनावर जाण्याचा हट्ट धरत होते. मात्र, पोलीस त्यांना जाऊ देत नव्हते. त्यामुळं काही कार्यकर्त्यांनी जमिनीवर बसकन मारली व 'जय श्रीराम' अशी घोषणाबाजी सुरू केली. अनेक कार्यकर्त्यांच्या हातात 'सोनिया सेना' असं लिहिलेले पोस्टर होते. घोषणाबाजी व पोस्टरबाजीतून वाद वाढू नये म्हणून पोलिसांनी बळाचा वापर करून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं गेलं. ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना पोलीस घेऊन जात असताना शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्याचवेळी, काही शिवसैनिकांनी भाजप कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचंही बोललं जात आहे. तसा आरोप भाजपनं केला आहे. शिवसैनिकांनी भाजपच्या महिला कार्यकर्त्यांना काठीनं मारल्याचा आरोप भाजपनं केला आहे.

### कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका ओळखून

# आवश्यक औषधी, उपकरणे यांचा पुरेसा साठा ठेवण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका ओळखून राज्यशासनाने आधीच पाऊले उचलण्यास सुरुवात केली असून आवश्यक त्या औषधी, वैद्यकीय उपकरणे यांची उपलब्धता राहील तसेच ग्रामीण भागातही याचा पुरेसा साठा राहील हे पाहण्याच्या सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या.

यासंदर्भात टास्क फोर्समधील डॉक्टर्स, वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेतच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी टास्क फोर्सच्या डॉक्टर्सनी राज्यभर सिरो सर्व्हेक्षण करणे, मोठ्या प्रमाणावर लसीकरण पूर्ण करणे यावर भर देताना निर्बंधांचे पालन काटेकोरपणे होणे गरजेचे आहे असे सांगितले. गर्दी वाढली आणि आरोग्याचे नियम पाळले गेले नाहीत तर दुसऱ्या लाटेतून सावरता सावरता आपण महिन्या दोन महिन्यात तिसऱ्या लाटेलाही सामोरे जाऊ भीती व्यक्त केली.

यावेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, प्रधान सचिव वित्त राजगोपाल देवरा, प्रधान सचिव आरोग्य डॉ.प्रदिप व्यास, डॉ रामास्वामी, डॉ संजय ओक, डॉ शशांक जोशी, डॉ राहुल पंडित, डॉ तात्याराव लहाने यांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री म्हणाले की ऑगस्ट- सप्टेंबर पासून देशाला ४२ कोटी लसी मिळताहेत अशी माहिती मिळते आहे त्यामुळे लसीकरण वेगाने सुरु होऊन महाराष्ट्रालाही त्याचा फायदा होईल. लसीकरण हा या लढाईत महत्वाचा भाग असला तरी आरोग्यविषयक नियमांचे पालन करणे, मास्क घालणे, सुरक्षित अंतर ठेवणे हे अत्यावश्यक आहे.

बैठकीत पुढच्या काळात लागणारी संभाव्य औषधे, त्यांची खरेदी , त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद, आरटीपीसीआर कीट, मास्क, पीपीई किट्स अशा बाबींवर विस्तृत चर्चा झाली, मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने हे उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी, असेही सांगितले.



## संक्षिप्त...

### राज्यात कोरोनाचे आज १०,१०७ नव्या रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून दैनंदिन नव्या करोना बाधित रुग्णांची संख्या ८ हजार ते १० हजाराच्या आसपास फिरताना दिसत आहे. आज दिवसभरात १० हजार १०७ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. याबरोबरच आज एकूण १० हजार ५६७ इतके रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. तसेच, आज दिवसभरात २३७ करोना बाधितांचा मृत्यू झाला आहे. आजच्या २३७ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूबरोबरच राज्यातील मृत्यूदर १.९४ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ५६ लाख ७९ हजार ७४६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९५.०७ टक्क्यांवर पोहोचले आहे.

राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या १ लाख ३६ हजार ६६१ इतकी झाली आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुण्यात एकूण १७ हजार ८२० इतके रुग्ण आहेत.

# मुंबई-गोवा महामार्गावर ट्रेलरला अपघात ; वाहतूक ३ तास ठप्प

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई-गोवा महामार्गावर पेण कडून पनवेलच्या दिशेने लोखंडी कॉईल वाहून नेणाऱ्या ट्रेलरला मंगळवारी शिरडोण गावाच्या जवळ अचानक अपघात झाला. या ट्रेलर वरील लोखंडी कॉईल रस्त्याच्या दुसऱ्या बाजुला जाऊन पडल्याने एकमार्गी रस्त्यावर सुमारे ३ तास दोन्ही बाजूची वाहतूक कोंडी झाली होती.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, डोलवी पेण येथील जेएसडब्ल्यू कंपनीतून ट्रेलर क्रमांक चक ०६ -उ ४६४८ हि लोखंडी काँईल घेऊन पनवेलच्या दिशेने जात होती. रात्रीच्या सुमारास शिरडोण गावाचे नजीक एकमार्गी रस्त्यावर समोरच्या बाजूने चुकीच्या मार्गावरून अचानक गाडी आल्याने सदर गाडीला वाचविण्याकरिता ट्रेलर चालकाने अचानक ट्रेलरला ब्रेक लावल्याने ट्रेलरवर ठेवलेली लोखंडी कॉईल ट्रेलरच्या केबिनला धडक देऊन दुसऱ्या बाजूला असलेल्या पनवेल कडून पेणला जाणाऱ्या वनवे रस्त्यावर जाऊन पडली. पेण कडून पनवेलला जाणाऱ्या एक मार्गिका रस्त्यावर ट्रेलरला अपघात झाल्याने तसेच पनवेल कडून पेणकडे येणाऱ्या एक मार्गिका रस्त्यावर महाकाय लोखंडी कॉइल पडल्याने दोन्ही बाजूच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली होती. सदरची लोखंडी कॉईल गरम असल्याने तातडीने नवीन पनवेल वाहतूक पोलीसांनी अग्निशमन दलाला पाचारण करून रस्त्यावर पडलेल्या काँईलला पाणी मारून थंड केले. तसेच क्रेनच्या सहाय्याने ट्रेलरचे तुटलेले ड्रायव्हर केबिन व कॉइल रस्त्यावरून बाजूला काढण्यात आले. रात्री सुमारे १ वाजेपर्यंत महामार्गावरील अडचणी दूर करण्याकरिता प्रयत्न सुरू होते. नवीन पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी कृष्णांत माने व इतर कर्मचाऱ्यांनी महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्याकरिता विशेष प्रयत्न केले.

### तळोजामध्ये आता होणार बी-फार्मसी कॉलेज

# कमळ गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेला मिळाली परवानगी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील कमळ हिरु गौरी पाटील शिक्षण संस्था (KGP) या बबनदादा पाटील चेअरमन असलेल्या संस्थेला फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) मार्फत आता नव्याने बी - फार्मसी कॉलेज सुरू करण्यासाठी परवानगी मिळाली आहे. यापूर्वी या संस्थेच्यावतीने डी - फार्मसीचे शिक्षण दिले जात होते आणि आता नव्याने बी - फार्मसीचे शिक्षण पनवेलसह नवी मुंबईतील विद्यार्थ्यांना जवळच उपलब्ध होणार आहे.

मुलांचे पालक आपल्या पाल्यांना इयत्ता १० वी नंतर सायन्स शाखेतून शिक्षण घेण्यासाठी अधिक प्रयत्न करीत असतात. सायन्स या शाख-`तून ११ वी आणि १२ वीचे शिक्षण घेतल्यानंतर पुढे काय करायचे ? हा प्रश्न पालकांसह विद्यार्थ्यांच्या मनात घर करून जातो. त्यामुळे बॅचलर ऑफ फार्मसी हा कोर्स करणे योग्य ठरते. या कोर्समध्ये .../२

# श्रीवर्धनमध्ये मुसळधार पावसाची धडक

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धनकरांना पावसाने चांगलंच झोडपून काढलं आहे. मागील आठवड्यात हवामान खात्याकडून वर्तवण्यात आलेल्या अतिवृष्टीच्या दिवसात पावसानं विश्रांती घेतली. पण आज बुधवारी बोर्लीपंचतन परिसरात मुसळधार पावसाने सुरुवात केल्याने सकळ भागात रस्त्यावर पाणी तर दरड कोसळल्याची घटना घडली आहे.



दिघी - वेळास मार्गावर भरणे घाटात कुडगाव आदिवासी वाडी जवळ एक किलोमीटर अंतरावर रस्त्यावर दरड कोसळल्याने दिघी जाणाऱ्या घाटातून वा-हतूक बंद करण्यात आली. बुधवार पहाटे पासून सुरू असलेल्या पावसामुळे बोर्लीपंचतन शहराला जोडणारा रस्ता सकाळी १० च्या सुमारास पाणी आल्याने काही काळ बंद झाला. तर काही ठिकाणी दरड कोसळल्यामुळे दिघीकडे जाणारी वाहतूक सर्वे मार्गे वळवण्यात आली. बोर्लीकडे येणारे वाहने शिस्ते येथे रस्त्यावर पाणी आल्याने दिवेआगरमार्गे श्रीवर्धनकडे जात होते. .../२

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

# ट्रेलरमधील मालासह अपहार करणाऱ्या त्रिकुटास तळोजा पोलिसांनी केले २४ तासात गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टाटा कंपनीच्या ट्रेलरमधील मालासह अपहार करणाऱ्या त्रिकुटास तळोजा पोलिसांनी अवघ्या २४ तासात ताब्यात घेवून त्यांच्याकडून चोरीचा पूर्ण माल हस्तगत केला आहे.

तळोजा पोलीस ठाणे गु. र. नं. १७६/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील फिर्यादी ओमप्रकाश जितेंद्र यादव, वय- ३७ वर्षे, धंदा- चालक, रा. अजिंक्य म्हात्रे यांची चाळ, समर्थ नगर, रामवडी, ता. पेण, जि. रायगड यांनी त्यांचे ताब्यातील टाटा कंपनीचा ट्रेलर हा मला सह मुंब्रा पनवेल रोड वर, एल ॲण्ड टी कंपनी समोर पार्क करून ठेवला असता तो कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला म्हणुन पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त झाल्याने तात्काळ वपोनि काशिनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पो नि संजय नाळे यांच्यासह सपोनि निकम, पोलीस हवालदार वैभव शिंदे, पोलीस नाईक सचिन पवार, .../२

### कोरोना संकटात सापडलेल्या पालकांना मदत करण्याचे सोडून

# उरणच्या युएई शाळेची फी वाढ ; पालक संस्थेविरोधात गुन्हा नोंदविणार



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

राज्यात कोरोना संकटाने मार्च २०२० पासून हाहा:कार माजवल्यामुळे राज्यातील सारी व्यवस्था कोलमडून पडली आहे अनेकांची परिस्थिती गंभिर बनली आहे. घराचा उदरनिर्वाह आणि मुलांचे शिक्षण कसे करावे या विवंचनेत असलेल्या राज्यातील जनतेला विविध स्तरांवर मदत, सवलती आणि योजना जाहीर करत आहेत. मात्र उरणच्या उरण एज्यूकेशन सोसायटीने न्यायालय आणि शासन निर्णय डावलून भरमसाठ फी केल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. शाळेच्या या फी वाढी विरोधात पालकानी आत्ता पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था ऑनलाईन पध्द-तीने सुरू झाल्यानंतर जवळपास सगळ्याच शाळांमधील तात्पुरत्या भरलेल्या शिक्षकांना घरी बसवण्यात आले आहे. शिक्षकांना वेतन, वीज, पाणी व तत्सम खर्च यात प्रचंड बचत झाली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून शिक्षणाव्यक्तीरिक्त कोणतीही फी आकारू नये, असा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. सरकारच्या या जीआरला संस्था चालकांच्या प्रतिनिधींनी हायकोर्टात दाद मागून स्थगिती मिळवली आणि या शाळांनी विद्यार्थ्यांकडून पूर्ण फी ओरबाडून घेतली. पुढे हे प्रकरण न्यायालयात सुनावणीत आल्यावर न्यायालयाने दिलेला स्थगिती आदेश उठवला. यामुळे शासन निर्णय कायम झाला. पण त्याची अंमलबजावणी करण्याऐवजी उरण एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काशिवाय इतरही फी आकारली. यात चक्क १२०० रुपये ही इ-लर्निंगच्या रक्कमेचा समावेश आहे. ज्यांनी ती दिली नाही, किंवा ज्यांची काही फी भरवयाची राहिली अशा मुलांचे निकाल शाळेने रोखून धरले आहेत. औरंगाबाद खंडपीठाने मुलांचे निकाल न अडवण्याचे आदेश २१ मे २०२१ च्या निकाल पत्रात दिला आहे. तरी सुद्धा याला न जुमानता आजतागायत ३२ पेक्षा जास्त मुलांचे निकाल शाळेने रोखून धरले आहेत. याचा दुष्परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर .../२

# आता महागाईची लाट!

करोनाची दुसरी लाट देशभरात थोडीशी आटोक्यात येत असतानाच महागाईच्या लाटेने जे तडाखे द्यायला सुरुवात केली आहे, ते गरीब आणि मध्यम वर्गासाठी जगणे आणखी कठीण करणारे आहेत. गेल्या वर्षी याच काळात ही महागाई उणे ३.३७ टक्के होती. म्हणजेच चलनसंकोच झाला होता. आज घाऊक आणि किरकोळ असे दोन्ही किंमत निर्देशांक हाताबाहेर जाताना दिसत आहेत. ही मुख्यत: केंद्र सरकारची जबाबदारी असून, मोदी सरकारने वेगाने पावले टाकली नाहीत, तर करोनातून सावरण्याचे सुख कोट्यवधी भारतीयांना मिळणार नाही. भारतीय अर्थकारणाला अजूनही गती मिळालेली नाही. तिसरी लाट तीव्र नसेल अशी आशा ठेवली, तरी सारे जनजीवन व आर्थिक व्यवहार पूर्वपदावर येण्यासाठी आणखी काही आठवडे लागू शकतात. अशा वेळी, वाढत्या महागाईमुळे आणि चलनवाढीने सामान्य माणसाची क्रयशक्ती कमी होणे, हे चांगले लक्षण नाही. आजच सामान्य माणसाच्या हातात पैसा नाही. उद्या तो आला आणि सगळा बाजार महाग असेल, तर तो खरेदी कशी काय करणार? आणि कोट्यवधी भारतीय बाजारपेठेत उतरून पूर्वीप्रमाणे खरेदी करणार नसतील, तर अर्थचक्राला गती मिळणार नाही. उलट, मागणी घटत राहील. अर्थव्यवस्थेचे असे उलटे चक्र फिरायचे नसेल, तर सरकारला त्वरित हस्तक्षेप करण्याची गरज आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारतात परकीय चलन गंगाजळीने विक्रमी वाढ नोंदवली आहे. हा आकडा जगात चौथ्या क्रमांकाचा, म्हणजे सहाशे अब्ज डॉलर इतका झाला आहे. दुसरीकडे, ताजा फटका सोडला, तरी शेअर बाजार नवनवे विक्रम करीत आहे; मात्र हे दोन्ही पराक्रम सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जीवन संघर्षात त्याला मदत करणारे नाहीत, याची गंभीर दखल केंद्र सरकार कधी घेणार आहे? सध्याच्या महागाईचे मूळ दुखणे इंधन दरांशी निगडीत आहेत. करोना काळात जगात कच्चे तेल स्वस्त मिळत असूनही ती स्वस्ताई केंद्र सरकारने कधी ग्राहकांपर्यंत पोहोचू दिलेली नाही. आता सारे जगच करोनामुक्तीकडे वाटचाल करीत असल्यामुळे, क्रूड तेलाचे भाव जगात झपाट्याने वाढत चालले आहेत. तेलाबाबत स्वयंपूर्ण झालेल्या अमेरिकेतही ते तीन वर्षांतील सर्वाधिक झाले आहेत. असे असताना तेल आयातीवर अवलंबून असणाऱ्या भारताला या दरवाढीचा मोठा फटका बसणार आहे. देशातील महागाई वाढण्याचे इंधन दरवाढ हे सर्वांत महत्त्वाचे आणि मूलभूत कारण असते. याचे कारण, मालवाहतूक, शेती, नागरिकांचा प्रवास, तेल वापरणारे उद्योग हे सारेच या महागाईच्या तडाख्यात सापडतात आणि ज्यांना ज्यांना शक्य असते ते आपल्यावरचे हे इंधन किंवा तेल भाववाढीचे ओझे पुढे किंवा खाली सरकवतात. यातूनच, शेवटी तळातला ग्राहक चहुबाजूंनी येणाऱ्या महागाईच्या हल्ल्यांनी गारद होतो. सध्या तसे होते आहे आणि पुढचे निदान काही महिने असेच होत राहणार. अशा वेळी, केंद्र सरकारने हस्तक्षेप करून तेलावरच्या करांचे आपले ओझे काही प्रमाणात तरी कमी करायला हवे. केंद्राने स्वत: कृतीतून उदाहरण घालून दिले, तरच राज्यांना असे कर कपातीचे आवाहन करण्याचा नैतिक अधिकार केंद्र सरकारला मिळेल. रिझर्व्ह बँकेला चलनवाढ रोखण्यात अपयश येते आहे, हे तर दिसतेच आहे. काही काळापूर्वी अर्थव्यवस्था रुळावर येण्यासाठी रिझर्व्ह बँकेने दोन उपाय सुचविले होते. त्यातला पहिला म्हणजे, करोनाची दुसरी लाट आटोक्यात आणणे आणि दुसरा, वस्तू, माल, सेवांची देशांतर्गत मागणी वाढविणे. लसीकरण किंवा इतर कारणांमुळे यातले पहिले उद्दिष्ट साध्य होताना तूर्त तरी दिसते आहे; मात्र बाजारातील मागणी वाढवायची असेल, तर नागरिकांच्या हातात पैसा जायला हवा आणि मुख्य म्हणजे हा पैसा जर त्यांच्या रोजच्या अन्नधान्य व गरजांवरच खर्च झाला, तर इतर गोष्टींसाठी त्यांच्याकडे पैसा राहणारच नाही. आजच्या वाढत्या महागाईने नेमके हेच होण्याची भीती आहे. यातून मार्ग काढण्याचे काही उपाय आहेत. पहिला म्हणजे, देशातील ग्रामीण व शहरी गरीब कुटुंबांच्या हातात आणखी थेट पैसे केंद्र सरकारला द्यावेच लागतील. त्यांना सावरावे लागेल. दुसरा, सगळ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून छोट्या व मध्यम उद्योगांना युद्ध पातळीवर नवी कर्जे द्यायला हवीत आणि जुन्या कर्जांचे नवे वेळापत्रक बनवायला हवे. तिसरा, सरकार मोफत धान्य वाटपाच्या घोषणा करीत असले, तरी सार्वजनिक धान्य वितरणातील ढिलाई शंभर टक्के काढून टाकायला हवी आणि चौथा व महत्त्वाचा उपाय म्हणजे, कोणत्याही स्थितीत यंदाचा कृषी हंगाम यशस्वी करण्यासाठी केंद्राने जिल्हावार लक्ष घालण्याची गरज आहे. हे सारे केले, तर दिवाळीनंतर महागाई काहीशी आटोक्यात येऊ शकते. मुळात, सरकारी तिजोरीत पैसा खेचण्यासाठी इंधनावर कर वाढवा, हा एक कलमी कार्यक्रम केंद्राने काही काळ आता थांबवायला हवा.

# टीम परिवर्तन व मान सन्मान प्रतिष्ठानच्या वतीने मोफत दंतचिकित्सा शिबिर

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



कोरोना संकटात कोणाला काय आजार तर कोणाला काय त्यामुळे नागरिक काही आजारांवर साधे उपचार करण्याकरिता देखील टाळाटाळ करतात या अनुषंगाने ग्रामीण भागातील काही समस्यांचा व आजारांचा विचार करत एक पाऊल पुढे व एक हात मदतीचा असे करत टिटवाळा येथील दहिवली या गावांत नुकताच टीम परिवर्तन व मान सन्मान प्रतिष्ठाण या युवकांच्या माध्यमातून तसेच अथक प्रयत्नांतून अनोखा दंत तपासनी व दंतचिकित्सा शिबीर घेण्यात आला असता याला येथील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देत लहान थोरांनी या दंतचिकित्सा उपचार घेतले.

सदरच्या आयोजित उपक्रमात कल्याण येथील दंत चिकित्सक डॉ. नेहा डोंगरे खडकबाण, डॉ. किरण जाधव आणि डॉ. अदिती माळुजंकर यांनी यावेळीं जमलेल्या सर्व मुलांची आणि गावकरी ग्रामस्थ नागरिकांच्या दातांची तपासणी केली. लहान मुलांनी प्रामुख्याने आपल्या दातांची काळजी कशी घ्यावी, दिवसांतून किती वेळा दात घासावेत आणि कशा पद्धतीने घासावेत यांची प्रात्यक्षिके यावेळीं मुलांना समजावून सांगितले. या दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन टीम परिवर्तन व मान सन्मान प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. टीम परिवर्तनचे तुषार वारंग, भुषण राजेशिर्के, मंगेश तिवारी, अविनाश पाटील यावेळीं उपस्थित होते. यावेळीं १०० पेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली आणि त्याचबरोबर सर्वांना मोफत पेस्ट आणि ब्रशचे वाटप यावेळी करण्यात करण्यात आले. दात घासण्यासाठी मुलांनी ब्रश आणि पेस्टशिवाय इतर कोणत्याही साहित्याचा वापर करू नये हा सल्ला देखील उपस्थित मंडळींना यावेळीं देण्यात आला.

ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना मौखिक स्वच्छता आणि चांगल्या आरोग्यासाठी दातांची निगा राखणे का गरजेचे आहे यांची माहिती देखील डॉ. नेहा डोंगरे खडकबाण यांनी यावेळीं उपस्थितांना दिली. दहिवली येथील युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे विशेष सहकार्य या दंतचिकित्सा शिबिरासाठी लाभले. मौलिख आरोग्याची काळजी घेणे का आवश्यक आहे यांची माहिती आजच्या शिबिरात आमच्या ग्रामस्थ मंडळींना मिळाली त्यांचा निश्चित त्यांना फायदा होईल असे सोमनाथ राऊत यांनी यावेळीं सांगितले. मान सन्मान प्रतिष्ठाणचे भावेश पैठणे, सुमित त्रिपाठी, संजय जांगळी, मालोजी बोडके, हर्षद फाले, अतुल राऊत यावेळी उपस्थित होते. सर्व उपस्थित मुलांना यावेळी मास्क आणि केकेचे वाटप देखील करण्यात आले.

# प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायमस्वरूप देण्यासाठी बबनदादा पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई, उरण आणि पनवेलमधील स्थानिक भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त यांनी बांधलेली गरजेपोटी घरे कायम करावी तसेच याबाबत एक बैठक आयोजित करावी अशी मागणी शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे मुंबईतील वर्षा बंगल्यावर झालेल्या भेटीत केली आहे.

गेले कित्येक वर्षे पनवेल, उरण आणि नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त सिडकोच्या होणाऱ्या जाचाला कंटाळला होता, येथील भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे सिडकोमार्फत तोडण्यात येत होती. मात्र महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर भूमिपुत्रांनी बांधलेली गरजेपोटी घरांवर सिडकोमार्फत कारवाई करण्यात आली नाही. मात्र हे जरी खरे असले तरी यावर तोडगा काढणे तितकेच गरजेचे असल्याचे लक्षात घेवून शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सदर घरे कायम होण्यासाठी प्रकल्पग्रस्तांची एक बैठक आयोजित करावी अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन यावेळी दिले. नुकत्याच पार पडलेल्या या भेटीदरम्यान राज्याचे मुख्यमंत्री तसेच शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह खा.अनिल देसाई, शिवसेना सचिव खा.विनायक राऊत, खा.राहुल शेवाळे यांच्यासोबत रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील आदी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तळोजामध्ये आता होणार बी-फार्मसी कॉलेज

औषधे कशी बनविली जातात, कोणत्या आजारांवर कोणती औषधे उपयुक्त ठरतात आदी विषयांची माहिती यामध्ये दिली जाते. आणि आता डी - फर्मासीसोबत बी - फार्मसीचे शिक्षणही आपल्या जवळच्या परिसरात मिळणार असल्यामुळे विद्यार्थी आणि पालकवर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

यावेळी कमळ हिरु गौरी पाटील शिक्षण संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील यांनी बोलताना सांगितले की, शिक्षण घेण्यासाठी आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांना मुंबई, पुण्यासारख्या ठिकाणी पायपीट करावी लागू नये, यासाठी आम्ही आमच्या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गुढी उभारत आहोत. आज संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणासह माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवीपर्यंतचे शिक्षण, डी - फार्मसी, लॉ कॉलेज आणि आता डी फार्मसी कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करीत आहोत. यावेळी बबनदादा पाटील यांनी त्यांच्या संस्थेच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## श्रीवर्धनमध्ये मुसळधार पावसाची धडक

आज काही तास दोन प्रमुख मार्ग पाण्याखाली आले होते. पण एका तासाभरात पाऊस थांबल्याने प्रवाशांनी सुटकेचा नि:श्वास टाकत प्रवास सुरू केला.

श्रीवर्धन - बोर्लीपंचतन व दिघी - बोर्लीपंचतन मार्ग पाण्याखाली असताना जोरदार अतिवृष्टीत वेळास - दिघी मार्गावर भरणे घाटातील कुडगाव आदिवासी वाडी जवळच रस्त्यावर मोठी दरड कोसळून दिघीकडे जाण्याचा मार्ग बंद झाला. त्यामुळे दिघी जाण्यासाठी पर्यायी वाहनांची वाहतूक सर्वे मार्गावर वळविण्यात आली व त्याचवेळी तत्परतेने दिघी सागरी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांनी घटनास्थळी जाऊन दोन तासात हेव्ही फोकल्यानंच्या मदतीने दरड हटवून रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत केले.

## तळोजा पोलिसांनी केले २४ तासात गजाआड

पोलीस नाईक दुर्वास पाटील, पोलीस नाईक अभिजीत दगडे, पोलीस शिपाई महेंद्र गायकवाड यांनी गुप्त बातमीदार व इतर तांत्रिक तपासाद्वारे शोध घेतला असता मुंबई नाशिक हायवे लागत भिवंडी येथील सोनाले गावा जवळ सदर ट्रेलर पार्क करून ठेवला असताना मिळून आला. त्यानुसार या पथकाने सापळा रचून सोपान एकनाथ पाटील, वय- ३४ वर्ष, रा. सरवली पाडा, पो. सरवली एम.आय.डी. सी, ता. भिवंडी, जि. ठाणे, जिशान खान, इरफान खान यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून चोरीच्या ट्रेलरसह मुद्देमाल असा मिळून जवळपास ४५ लाखाच्या आसपास हस्तगत केला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुधीर निकम करीत आहेत.

## उरणच्या युएई शाळेची फी वाढ ; पालक संस्थेविरोधात गुन्हा नोंदविणार

होत आहे. म्हणून अशा मुलांचे निकाल त्वरित देण्याची पालकांची आग्रही मागणी आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १५ टक्के इतकी सवलत देण्याचा निर्णय दिला. खरं तर सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही निर्णय सर्व राज्य आणि न्यायालयांना संदर्भ म्हणून विचारात घ्यायचा असतो. असे असतानाही उरण एज्युकेशन संस्थेने तर भर कोरोना काळात पीटीएचा फी मध्ये सवलत देण्याचा प्रस्ताव नाकारून ३६ ते ४२ टक्के इतक्या फी वाढीचा प्रस्ताव दिला. मात्र पीटीएचा सदर प्रस्ताव अमान्य करत संस्थेने राज्य फी स्क्रूटीनी कमिटीकडे अपील करत सरसकट १५ टक्के इतकी फीवाढ जाहीर करून टाकली. शाळा चालकांचे हे कृत्य म्हणजे संकटातील पालकांना दरीत लोटण्याचा व जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे.

संस्थेने १ ली, ५ वी, ८ वी, १२ वीचे प्रवेश जाहीर करत या प्रवेशासाठी वरील रक्कम भरण्याची सक्ती केली आहे. विशेष म्हणजे यातही पूर्णत: बंद असलेल्या इ-लर्निंगच्या फीची आकारणी करण्यात आली आहे. सरकारचा शासन निर्णय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे उरण एज्युकेशन संस्थेने जाहीर केलेली फी ही सद्यपरिस्थितीत पूर्णपणे अयोग्य व अन्यायकारक असून, ती मान्य करणे म्हणजे पालकांची आर्थिक पिळवणूक करण्यासारखे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाधीन शाळेची फी १५ टक्के इतकी कमी करणे आणि सरकारच्या शासननिर्णयानुसार शिक्षणेतर फी न आकारल्यास विद्यार्थ्यांना विद्यमान फीमध्ये सरसकट ३२ टक्के इतकी सवलत मिळणे क्रमप्राप्त आहे. हे लक्षात घेऊन उरण एज्युकेशन संस्थेने आकारलेली फी तात्काळ मागे घेण्यात यावी अशी मागणी पालकांनी केली आहे.अन्यथा संस्थेच्या निर्णयाविरोधात सनदशीर मार्गाने आंदोलन छेडून संस्थे विरोधात तक्रार दाखल करण्याचा इशारा पालकांनी दिली आहे. आज झालेल्या पत्रकार परिषदेत पालकांनी ही माहिती दिली. या पत्रकार परिषदेला पालक संघाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार प्रविण पुरो, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष प्रशांत पाटील, दत्तात्रेय शेळके, बिकेन अजमेरा, निलेश कदम, हेमा घरत, भारती कडू, पुनम काटेकर, संपदा मोकल आदी उपस्थित होते.

# रोहा शहरात विनाकारण फिरणाऱ्या ४१ नागरिकांची केली अँटिजेन टेस्ट

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा शहर ग्रामीण भागातील नागरीकांसाठी बाजाराचे ठिकाण असल्याने हजारो लोक खरेदीसाठी ये जा करीत असतात. मात्र काही महाभाग असेही घरात बसून कंटाळा आला म्हणून टाईमपास करण्यासाठी येतात. अश्या लोकांवर आता रोहा पोलिसांनी करडी नजर ठेवली आहे. अश्या विनाकारण फिरणा-या लोकांना आटोक्यात आणण्यासाठी रोहा पोलिसांकडून आता चक्क अँटिजन टेस्ट केली जात आहे.

रोहा प्रवेशद्वाराजवळ हॉटेल रोहा प्राईड समोर रोहा पोलीसांनी विणाकारण फिरणा-यांची खुद्द अँटीजन टेस्ट करायला सुरुवात केली. दिवसभरात असे विनाकारण फिरणा-या ४१ नागरिकांची अँटीजन टेस्ट केली. यात १ व्यक्ती पॉझीटिव्ह तर ४० निगेटीव्ह आढळून आले. या व्यक्तीला रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी रोहा पोलीस निरीक्षक नामदेव बंडघर पोलीस उपनिरीक्षक अलोक किस्मत्वार, ट्राफिक पोलीस हवालदार हणमंत धायगुडे व पोलीस सहकारी, यांच्यासह टेस्टिंग कर्मचारी सहभागी झाले होते.

# नागोठणे वनक्षेत्र कार्यालयाच्या वतीने ऐनघर येथे वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । वाकण**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन नागोठणे वनक्षेत्र कार्यालयाच्या वतीने नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दिती वनक्षेत्रामध्ये मंगळवार दि. १५ जुन रोजी सकाळी अकरा वाजता वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नागोठणे वनक्षेत्रपाल अधिकारी सुहास रणवरे, ऐनघर चौकीचे पोलिस उपनिरिक्षक परशुराम भोईर व ऐनघर ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते ऐनघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वनक्षेत्रातील जागेमध्ये पिंपळ, वड, काजु,आंबे अशा अनेक प्रकारच्या रोपाची वृक्ष लागवड करण्यात आली. याशिवाय विविध प्रकारच्या रोपांचे सुहास रणवरे यांच्या हस्ते ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला नागोठणे वनक्षेत्रपाल अधिकारी सुहास रणवरे, ऐनघर पोलिस चौकीचे पोलिस उपनिरिक्षक परशुराम भोईर, आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.६२१/२०२१
ने.ता.१९/०७/२०२१

श्री.जहिंद्र गोविंद कडू
वय : ५१ वर्षे, मु.रांजणपाडा, पो.खारघर,
सेक्टर २७, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वहाळ
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.जहिंद्र गोविंद कडू यांचा मुलगा श्री.सर्वेश जहिंद्र कडू याचा जन्म दि.२०/११/२००४ रोजी वहाळ गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असल्या कारणाने अर्जदारांच्या मुलाची जन्माची नोंद करून मिळणे करिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने या पनवेल न्यायालयात श्री.सर्वेश जहिंद्र कडू यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू श्री.सर्वेश जहिंद्र कडू यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१५/०६/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्यायाधिश, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्यायाधिश, पनवेल**

# मासे मारण्याचे जाळे विणण्यात विणकर मग्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

पासाळ्यात नदी,नाले,ओढे,तलाव आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मासेमारी केली जात असल्याने मासे मारण्यासाठी आवश्यक असलेल्या जाळ्याला मोठी मागणी असल्याने कुशल विणकर सध्या जाळे विणण्यात मग्न झाले असल्याचे पहावयास मिळत आहेत.

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर माशांची पैदास होऊन अगदी परतीचा पाऊस संपेपर्यंत मासेमारी चाललेली असते. गळ लाऊन मासे पकडणे, एखादा डबका किंवा ओढा तसेच नाल्यातले पाणी ऊपसून मासे पकडणे, निवटी लाऊन मासे पकडणे तसेच जाळे टाकून मासे पकडणे आदी मासे पकडण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. यामध्ये जाळे टाकून मासे पकडण्याला जास्त प्राधान्य दिले जात असल्याने व या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर मासे मिळत असल्याने सर्रास याच पद्धतीचा वापर केला जातो. त्यामुळे मासे मारण्यासाठी लागणारे जाळे याला या कालावधीत मोठी मागणी असल्याने जाळे विणणारे विणकर यांनाही या कालावधीत ब-यापैकी आर्थिक फायदा होतो.

जाळीचा आकार, त्यासाठी वापरलेला सूत,जाळीची विणणी यावर जाळ्याची किंमत अवलंबून असते.त्यातल्या त्यात साधारणपणे २०० ते २५० रूपयांपासून ते ८०० ते १००० रूपयांपर्यन्त एका जाळ्याची किंमत आकारली जाते.यंदाच्या पावसाळी हंगामात जोरदार होत असलेल्या पर्जन्यव्रुष्टीमुळे मासे मारण्याच्या जाळ्यांना चांगली मागणी वाढल्याने जाळी विणणारे कारागीर यांच्याही हाताला काम मिळाल्याने सुगीचे दिवस आले आहेत.सध्या पाऊस ब-यापैकी पडत असल्याने मासे मारण्याच्या जाळ्यांना रोजच मागणी येऊ लागल्याने या कोरोना काळात हाताला चांगले काम मिळत असल्याबाबतची प्रतिक्रियाही रोठ खु.वाघेश्वर नगर येथील कुशल विणकर श्रीयुत मोरे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, रत्नमाला गजानन ठाकूर, ताराबाई मधुकर जाधव, चांगुणा प्रभाकर ठाकूर, रोहिणी गणेश म्हात्रे, यशोदा पांडुरंग ठाकूर, रुपेश पांडुरंग ठाकूर व योगेश पांडुरंग ठाकूर, रा.बांधपाडा यांच्या सामाईक मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जात असलेली खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बांधपाडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नांव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बांधपाडा, ता.उरण | ५७ | ७ | ०-१२-४० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२५-७० | ०.८१ |

रत्नमाला गजानन ठाकूर, ताराबाई मधुकर जाधव, चांगुणा प्रभाकर ठाकूर, रोहिणी गणेश म्हात्रे, यशोदा पांडुरंग ठाकूर, रुपेश पांडुरंग ठाकूर व योगेश पांडुरंग ठाकूर यांच्या सामाईक मालकीची असून सदर मिळकत आमचे अशिलांना नोंदणीकृत खरेदीखताने/करारनाम्याने विकत देण्याचे निश्चित केले आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखमीची असल्याचा व आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार त्यांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर शेतजमीन मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्कहितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसाचे आत आपल्या हक्कहितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे/खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१६/०६/२०२१

**सही/-**
**ॲड.शिवराज गणपत राणे**
**सावली रो-हाऊस, प्लॉट-अे/२१,**
**सेक्टर ६, नवीन पनवेल-४१०२०६**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कारच्या सायलेंन्सरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोसायटीच्या समोर उभ्या करून ठेवलेल्या चारचाकी वाहनाच्या सायलेंन्सरची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

सुशांत शंकर पवार यांनी त्यांची इको गाडी क्र.एमएच-४६-बीक्यू-१५९५ ही खारघर वसाहतीमधील सेक्टर २० श्रमिक सोसायटीच्या समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने त्याच्या गाडीचा सायलेंन्सर ज्याची किंमत जवळपास २० हजार रुपये इतकी आहे. चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र, निजामपूरसाठी मौजे किंजळोली बुद्रुक येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, निजामपूर या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार मौजे किंजळोली बुद्रुक, ता.महाड जि. रायगड येथील गावठाण क्षेत्र १-४९-०० हे.आर. पैकी ०-०४-०० हे.आर.ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे प्राथमिक आरोग्य केंद्र, निजामपूर करिता हस्तांतरित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

## प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पेडली साठी मौजे तिवरे येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सुधागड- पाली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पेडली या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मौजे तिवरे, ता.सुधागड जि. रायगड येथील स.नं.३८, क्षेत्र ०-५८-० हे.आर. पैकी ०-०५-०० हे.आर.ही जमीन या मसणवटा ग्रुप ग्रामपंचायत तिवरे यांच्या नावे दाखल असलेल्या शासकीय मिळकती भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने ही शासकीय जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पेडली करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत.

# पुर्वसुचना न देता पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित : ग्रामपंचायतीतर्फे वीज अभियंत्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



कोणतीही पुर्वसुचना न देता महावितरणने ऐन पावसाळ्याच्या सुरुवातीला मुरुड तालुक्यातील बोर्ली, मांडला व भोईघर ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त होत असून पथदिव्यांचा वीजपुरवठा तातडीने सुरु करण्यात यावा.याबाबत मुरुड चे वीज अभियंता यांना ग्रामपंचायतीच्या वतीने एक निवेदन देण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.

तालुक्यातील बोर्ली, मांडला व भोईघर या ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने बोर्ली ग्रामपंचायतीत बोर्ली मांडला व भोईघर ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच व सदस्य यांची नुकतीच एक बैठक घेण्यात आली.सदर बैठकीत दि.१५ जून रोजी महावितरणने ऐन पावसाळ्याच्या सुरुवातीला कोणतीही पुर्वसुचना न देता पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने ग्रामस्थांना रात्री-अपरात्री विषारी साप आणि विंचू जीवजिवाणू पासून वेळप्रसंगी केव्हाही जिवितास धोका, अपघाताची शक्यता लक्षात घेऊन तातडीने पथदिव्यांचा वीजपुरवठा पुर्ववत सुरू करण्यात संबंधित वीज अभियंता यांना निवेदन देण्यात आले.

याबाबत ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,दि.१५ जून २०२१ रोजी महावितरणने कोणती पुर्वसुचना न देता पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.यापुर्वीही माहे मार्च २०२१ मध्ये ऐन होळी सणाच्या तोंडावर अशीच कोणती पुर्वसुचना न देता थकित वीज बीजाचे कारण दाखवून पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता.याबाबत खात्री केली असता यापूर्वीचे पथदिव्यांचे वीजबिल जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

परंतु सद्यस्थितीत भरमसाठ थकलेले वीजबिल ग्रामपंचायतीने भरावे असा तगादा महावितरण कडून लावण्यात आला होता. याबाबत आम्हाला कोणत्याही प्रकारची कल्पना नव्हती व तशा प्रकारची तरतूद ग्रामपंचायतीच्या अंदाज पत्रकात व आर्थिक आराखड्यात केलेली नव्हती.त्यामुळे संभ्रम निर्माण होऊन ग्रामपंचायत आर्थिक कोंडीत सापडली आहे. सणासुदीच्या काळात पथदिवे सुरू राहण्यात वीज बीलापोटी काही रकमेचा भरणा करण्यात आला होता. तदनंतर दि.१५ जून रोजी कोणती पुर्वसुचना न देता पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने याबाबत संबंधित अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता वरील आदेशानुसार वीजपुरवठा खंडित करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. ग्रामपंचायत टप्प्याटप्प्याने बील भरीत असताना वीजपुरवठा खंडित करताना ग्रामपंचायतीला पुर्व सुचना देणे अपेक्षित होते. लोकप्रतिनिधी गावच्या विकासात प्रयत्नशील असताना प्रशासनाकडून योग्य सहकार्य मिळत नसेल तर ही शोकांतिका आहे.पथदिव्यांच्या वीजबिल साठी नियोजन व तरतूद कशी करावी, ग्रामपंचायतीचे तुटपुंजे उत्पन्न व वेळोवेळी येणारी संकटे पाहाता वीजबिल बाबत राज्य सरकार, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांजकडून मार्गदर्शन होणे गरजेचे होते. परंतु तसे न झाल्याने याचा त्रास सर्व सामान्य जनतेला होत आहे. पथदिव्यांअभावी ऐन पावसाळ्याच्या सुरुवातीला दुर्गम ग्रामीण भागातील जनतेला होणारा त्रास लक्षात घेऊन शासन स्तरावर वीजबिल भरणे बाबत तरतूद करण्यात येऊन ग्रामपंचायतीला सहकार्य मिळावे.असे ग्रामपंचायतीच्या वतीने महावितरणला देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.सदर निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, ऊर्जामंत्री नितिन राऊत, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष, मुरुड तहसीलदार गमन गावित, पंचायत समितीचे सभापती, गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. यावेळी बोर्ली सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, सदस्य गणेश कट, भोईघर सरपंच काशिनाथ वाघमारे, मांडला सरपंच सुचीता पालवणकर, उपसरपंच राजेश पाटील, सदस्य उपस्थित होते.

# माणगांवच्या मयुरेश बापटची आदर्शवत कृती आपली पहिली कमाई केली दान





**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव सिध्दीनगर मधिल रहिवासी मयुरेश मुकुंद बापट हा तरुण टीसीएस (TCS) कंपनीत सॉफ्टवेयर डेव्हलपर (software developer) या पदावर काम करत आहे. पंचविस वर्षाच्या या तरुणाने नुकतेच नोकरी लागताच आपल्या पहिल्या पगाराची पहिली कमाई समाजातील गरीब गरजवंतांना भेटवस्तु स्वरुपात दान केली आहे. माणगांवच्या मयुरेश बापटची ही आदर्शवत कृती पाहुन त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे असुन मयुरेश सारख्या संस्कारी तरुणांची आजच्या समाजाला गरज असल्याचे म्हणत अनेकांनी त्याचे कौतुक केले आहे.

लहानपणीच वडीलांचे छत्र हरपल्याने गरिबीची जाणीव असलेल्या या तरुणाने लहानपणापासूनच मनात निश्चय केला होता की नोकरीला लागल्यावर, गरिब आणि गरजू लोकांना मदत करायची आणि त्याप्रमाणे दिनांक १४ व १५ जुन रोजी मयुरेशने मिळालेल्या पहिल्या पगारातून ही मदत माणगांव मधिल २१ सफाई कामगार तसेच घरेलु काम करणाऱ्या महिला व बोरवाडी येथील आदिवासी गरीब गरजवंताना त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जिवनावश्यक वस्तुंचे किट व पावसाळी वापरण्यासाठी छत्री चे वाटप करताना खुप आनंद झाल्याचे म्हटले आहे.

यापुढेही अशीच मदत करण्याची इच्छा आहे व याची प्रेरणा माझ्या आईकडून मला मिळाली असल्याचे तसेच या कार्यात समाजसेविका मयुरा अजित तार्लेकर, मित्र निखिल वाले आणि पर्यावरण अभ्यासक शंतनु कुवेसकर व माझे कुटुंबिय यांचे प्रोत्साहनाने ही मदत वाटप केल्यानंतर मित्रपरिवाराने माझे खुप कौतुक केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या असे सांगताना मयुरेशच्या चेहऱ्यावर समाधान दिसुन आले. माझ्या सारख्या तरुण मित्रांना मला सांगायला आवडेल की फक्त स्वतःसाठी न जगता इतरांसाठीही जगायला शिका. आपल्या ऐपती प्रमाणे खारीचा वाटा उचला आणि समाजप्रबोधन व विकास साधा ! असे सांगताना योग्य लोकांपर्यंत मदत पोहोचवण्यासाठी जेष्ठपत्रकार यांच मार्गदर्शन मिळाल्याने मयुरेशने त्यांचेही आभार मानले आहेत.

# रिक्षाच्या कर्जाचे हप्ते पुढे ढकलावे मुख्यमंत्र्यांना केली संतोष आमले यांनी पत्राद्वारे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या सावटा खाली गेल्या वर्षा पासून पूर्ण जग जात आहे कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करत आहे. लॉकडाऊन हळू हळू उठवण्याचा प्रयत्न सुरु आहे परंतु अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.

त्यात रिक्षा चालक सुद्धा संकटात सापडला व्यवसाय नसल्याने अनेक रिक्षा चालकावर उपास मारीची वेळी आली, कुटूंब चालवायचं कस या चितेत रिक्षा चालक असून ,त्यात रिक्षा वर असलेले बँक फायनान्स चे कर्ज फेडायचे कसे त्यात थकीत हप्ते भरण्यासाठी तगादा लावला जातो व्यवसाय कमी झाल्या मुळे कोरोना काळातील थकीत हप्ते भरायचे कसे या चिंतेने रिक्षा चालक खचून गेला आहे.

कर्जापाई महाराष्ट्रात अनेक रिक्षा चालकाने आत्महत्या केल्यात, महाराष्ट्र शासनाने केलेली १५००रुपयांची मद्दत तोकडी असून . तरी महाराष्ट्र शासनाने कोरोना काळातील रिक्षावर असलेले बँक फायनान्सचे कर्जाचे हप्ते गेल्या वर्षा प्रमाणे आता ही पुढे ढकलण्याचे आदेश द्यावेत त्या मुळे सध्या रिक्षा चालकांना कर्ज फेडण्यास सोपे जाईल. अशी मागणी संतोष शिवदास आमले यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्राद्वारे केली.

# विक्रांत पाटील यांनी केली महापालिका आयुक्तांकडे लसिकरण केंद्र वाढवण्यासाठी मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल महानगरपालिका क्षेत्रा मध्ये लसीकरण सध्या सुरू आहे टप्प्याटप्प्याने सुरू झालेले लसीकरण आता अंतिम टप्प्याकडे जात आहे. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून पासून १८-४४ वयोगटातील नागरिकांना लसीकरण करण्याची घोषणा केली आहे.

या वयोगटातील नागरिकांची संख्या लक्षात घेता सध्या असलेले लसीकरण केंद्र अपुरी पडणार आहेत त्यामुळे सर्वच केंद्रांवर झुंबड उडणार आहे,याचा अनुभव ४५ वर्षांवरील नागरिकांच्या लसीकरणाच्या वेळी ही आला होता.त्यावेळी जेष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल झाले होते. या सर्व गोष्टी लक्षात घेता नगरसेवक विक्रांत पाटील यांनी या आधीही लसीकरण केंद्रांची संख्या वाढवण्यासाठी पत्र महापालिका आयुक्त यांच्याकडे दिले आहेत. आपल्या पत्राची दखल घेऊन लसीकरण केंद्रांची संख्या महापालिका आयुक्त नक्की वाढवतील आणि पनवेलकरांना दिलासा देतील असें रास्त मत नगरसेवक विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले.

# अलिबाग आगारातील वाहन चालक व वाहक यांचा प्रामाणिकपणा ; ३५ हजार रुपये केले परत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग आगारातील बसचालक व वाहक यांनी बसमधील प्रवाशाची विसरलेली बॅग व त्याचे पैसे प्रामाणिकपणे परत करून एक आदर्श निर्माण केला आहे.

दि.१५ जून २०२१ रोजी सकाळी ०८:१५ वाजता रेवदंडा व ०९:१५ वाजता अलिबागहून जाणाऱ्या रेवदंडा-बोरिवली गाडी क्र.३२३४ मधील एक प्रवासी त्याची बॅग विसरला होता. बसचालक निलेश पाटील व वाहक जितेंद्र पवार यांनी या प्रवाशाची विसरलेली बॅग व बॅगमधील रोख रु. ३५ हजार, ओळख पटवून त्यास परत केली.

त्यांच्या या प्रामाणिक कृत्यामुळे अलिबाग आगाराची व एस.टी महामंडळाची प्रतिमा जनमानसात उज्वल केल्याबद्दल या दोन्ही प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा आगार व्यवस्थापक श्री.अजय वनारसे यांच्या हस्ते आज अलिबाग आगारात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.


## जाहिरनामा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल-१**
**अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका पदभरती -२०२१**

जा.क्र.एबाविसेयो/आस्था-१/अंसेभ/१२३/२०२१ जाहिरात क्र.१/२०२१

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१२/ प्र.क्र.४२९/का.०६ दि. १३ ऑगस्ट, २०१४ तसेच महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१६/प्र.क्र.२३०/का.६/ दि. २२ सप्टेंबर, २०१६. शा. नि. क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.२२३/का.६ दि.१७.०१.२०२०, शासन निर्णय क्र. एबावि-२०१९/ प्र.क्र. ३०५ / का-६/ दि. १७ जानेवारी, २०२०, परिपत्रक क्र.एबाविसेयो/का-७/अंगणवाडी पदभरती/२०२०/३६७/ दि. ३०.०१.२०२०, परिपत्रक क्र.एबाविसेयो/नमुंबई/का-७/२२१/२०२० दि. २०/०५/२०२१. अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पनवेल-१ अंतर्गत अंगणवाडी सेविका ११ (अकरा) पदे व मिनी अंगणवाडी सेविका ०१ (एक) पदे अशी एकूण १२ (बारा) पदे भरावयाची आहेत. त्याकरीता संबंधीत गावातीलच (ग्रामपंचायत नव्हे) ज्या गावात अंगणवाडी केंद्र आहे अशा गावातील स्थानिक महिला उमेदवारांकडून जाहिराती मधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पद्धतीने कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दिनांक ३०/०६/२०२१ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस उमेदवाराचे वय २१ वर्षे ते ३० वर्षे इतके असावे. अंगणवाडी सेविका या पदासाठी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**अंगणवाडी निहाय भरावयाच्या पदांचा तपशिल**

**अंगणवाडी सेविका -१२ पदे-** १) बामणडोंगरी-१, २) उलवा-१, ३)भंगारपाडा, ४) वरचा ओवळा, ५) कोपर, ६) कराडे खु. ७) साई -१, ८) चिखले-२, ९) भिंगार-१, १०) पळस्पे-४, ११) चिंचवण-१

**मिनी अंगणवाडी सेविका १ पदे -** १) घेराकिल्ला

टिप :- अर्जाचा नमुना व अटी-शर्ती ग्रामपंचायत स्तरावर प्रसिद्ध करण्यात आलेला असून प्रत ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहेत. तसेच अर्जाचा नमुना व अटी-शर्ती एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल-१ कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

दिनांक : १७ जून २०२१

**सही/-**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बालविकास सेवा योजना,**
**प्रकल्प पनवेल-१**



## जाहिरनामा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल-२**
**अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका पदभरती -२०२१**

जा.क्र.एबाविसेयो/आस्था-१/अंसेभ/१८०/२०२१ जाहिरात क्र.१/२०२१

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि- २०१२/ प्र.क्र.४२९/का.०६ दि. १३ ऑगस्ट, २०१४ तसेच महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१६/प्र.क्र.२३०/का.६/ दि. २२ सप्टेंबर, २०१६. शा. नि. क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.२२३/का.६ दि.१७.०१.२०२०, शासन निर्णय क्र. एबावि-२०१९/ प्र.क्र. ३०५ / का-६/ दि. १७ जानेवारी, २०२०, परिपत्रक क्र.एबाविसेयो/का-७/अंगणवाडी पदभरती/२०२०/३६७/ दि.३०.०१.२०२०, परिपत्रक क्र.एबाविसेयो/नमुंबई/का-७/२२१/२०२० दि. २०/०५/२०२१ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पनवेल-२ अंतर्गत अंगणवाडी सेविका १३ (तेरा) पदे व मिनी अंगणवाडी सेविका ०४ (चार) पदे अशी एकूण १७ (सतरा) पदे भरावयाची आहेत. त्याकरीता संबंधीत गावातीलच (ग्रामपंचायत नव्हे) ज्या गावात अंगणवाडी केंद्र आहे अशा गावातील तसेच महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या संबंधीत वॉर्ड/ प्रभागामधील स्थानिक महिला उमेदवारांकडून जाहिराती मधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पद्धतीने कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दिनांक ३०/०६/२०२१ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस उमेदवाराचे वय २१ वर्षे ते ३० वर्षे इतके असावे. अंगणवाडी सेविका या पदासाठी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**अंगणवाडी निहाय भरावयाच्या पदांचा तपशिल**

**अंगणवाडी सेविका -१३ पदे-** १) चिंचवली त. त. (ग्रा.पं शिरवली), २) उसर्ली बु. (ग्रा. पं.उमरोली), ३) नितळस-१ (ग्रा.पं. नितळस), ४) भोकरपाडा (ग्रा.पं. चिपळे), ५) खैरणे-१ (ग्रा.पं. खैरणे), ६) धानसर (म.न.पा.प. प्रभाग-१), ७) तुर्भे (म.न.पा.प. प्रभाग-१), ८) पेंधर -४ (म.न.पा.प. प्रभाग-१), ९) देवीचा पाडा-१ (म.न.पा.प. प्रभाग-२), १०) पाले खु (म.न.पा.प. प्रभाग-२), ११) नागझरी (म.न.पा.पं. प्रभाग-२), १२) तळोजा उर्दु (म.न.पा.प. प्रभाग-३), १३) जुई (म.न.पा.प. प्रभाग-१३)

**मिनी अंगणवाडी सेविका - ४ पद -** १) तामसई (ग्रा.पं. खैरवाडी), २) टॉवरवाडी (ग्रा. पं. मालडूंगे), ३) वाजापूर (ग्रा.पं.वाजे), वाघ्राची वाडी (म.न.पा. प. प्रभाग-९)

**टिप :-**अर्जाचा.नमुना व अटी-शर्ती ग्रामपंचायत /वॉर्ड/प्रभाग या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेला असून प्रत ग्रामपंचायत /वॉर्ड/ प्रभाग या ठिकाणी उपलब्ध आहेत. तसेच अर्जाचा नमुना व अटी-शर्ती एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल-२ कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

दिनांक : १७ जून २०२१

**सही/-**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बालविकास सेवा योजना,**
**प्रकल्प पनवेल-२**



## ग्रामपंचायत देवद

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा सूचना

दि.१६/०६/२०२१

ग्रामपंचायत देवदसाठी २०२१/२२ या सालाकरिता ग्रामपंचायत फंडातून विकास कामे करावयाची आहेत. त्यासाठी मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून दि.१७/०६/२०२१ ते दि.२३/०६/२०२१ रोजी ५ वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात जाहीर दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रक दि.२४/०६/२०२१ रोजी सायं.४ वाजता निविदाधारक अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्षक | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | ५% अनामत रक्कम | मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | देवद प्रितम इंटरप्रायझेस ते साई निवास बिल्डींग पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | ग्रामनिधी | १८०००० | १८०० | ९००० | ३ महिने |
| २ | देवद प्रितम इंटरप्रायझेस ते स्वामी शरण बिल्डींग पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | ग्रामनिधी | १७०००० | १७०० | ८५०० | ३ महिने |
| ३ | देवद स्वामी शरण बिल्डींग ते जानकार एम्पायर बिल्डींग पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | ग्रामनिधी | १९६०८५ | १९६१ | ९८०४ | ३ महिने |
| ४ | देवद विकासवाडी अंतर्गत साई संगम सोसायटी ते कोकण रेसिडेन्सी पर्यंत आर.सी.सी.पाईप गटार बांधकाम करणे | ग्रामनिधी | ४२६०६५ | ४२६१ | २१३०३ | ३ महिने |
| ५ | पुष्पनारायण सोसायटी ते मोरी नं.२ पर्यंत जी.आय.पाईप लाईन जोडणेबाबत. | ग्रामनिधी | १४९१८५ | १४९२ | ७४५९ | ३ महिने |

**अटी व शर्ती :-**

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक १७/०६/२०२१ ते २३/०६/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२.आलेल्या निविदा दि. २४/०६/२०२१ रोजी सायं. ४:०० वाजता उघडण्यात येतील .

३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.

४.निविदा/कोटेशन पोस्टाने दिनांक २३/०६/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.

५.नियमा प्रमाणे सर्व शासकीय भरणा करावा लागेल.

६.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

७.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.

८.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

९. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .

१०.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१२.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१३.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१४.निविदा मंजूर केलेल्या प्रमाणे काम करण्यात यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

१५.प्राप्त दरपत्रकापैकी कोणतेही एक दरपत्रक स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**सौ.प्रतिभा पुंडलिक वानखेडकर**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत देवद**
**देवद, ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.शितल प्रभाकर सोनावणे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत देवद**
**देवद, ता.पनवेल, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## बलात्कार आणि बालविवाहाचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१६ वर्षीय अल्पवयीन मुलीशी लग्न केल्याने ३४ वर्षीय दिपक भगवान गवळी यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बलात्कार आणि बालविवाहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिपक गवळी यांनी १६ वर्षीय अल्पवयीन पीडित मुलीसोबत मे २०20 मध्ये लग्न केले. ती गर्भवती राहिल्याने डॉक्टरांकडे गेली असता डॉक्टरांनी तीला वय विचारले. यावेळी तिने सोळा वय सांगितले. त्यामुळे डॉक्टरांनी याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

## १४ वर्षीय मुलीवर बलात्कार, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१४ वर्षे मुलीला आरोपीने पाठीमागून येऊन मिठी मारुन तिच्यावर बलात्कार केला आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आरोपी गणेश विश्वनाथ पवार (वय १९) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल तालुक्यातील १४ वर्षे पीडित मुलगी घराजवळील जंगलामध्ये शौचाला गेली होती. यावेळी आरोपी गणेश पवार याने पाठीमागून येऊन तिला मिठी मारली आणि आरडाओरडा करू नको म्हणून तिचे तोंड दाबून तिच्यावर बलात्कार केला. तालुका पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवीन आरोग्य उपकेंद्र, आमडोशीसाठी मौजे वरवठणे येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील अगदी ग्रामीण स्तरापर्यंतची आरोग्य यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. अनेक वर्षांपासून मंजूर झालेल्या आरोग्य केंद्रांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही प्रलंबितच होती. मात्र पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत आरोग्य केंद्रांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.या पार्श्वभूमीवर रोहा तालुक्यातील नवीन आरोग्य उपकेंद्र, आमडोशी या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मौजे वरवठणे, ता.रोहा जि. रायगड येथील गट.नं.७७ एकूण क्षेत्र ०-१२-५० हे.आर. पैकी ०-०५-०० हे.आर.ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे नवीन आरोग्य उपकेंद्र, आमडोशी करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत. रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.

# कामोठे वासियांच्या समस्या निवारण्यासाठी नगरसेवक विकास घरत आक्रमक

## अधिकाऱ्यांना धारेवर धरताच कामे लागली मार्गी

**दै.रायगड नगरी । पनवेल**





कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३४ मधील नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत. येथील सांड पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या जीर्ण झाल्याने टाक्या मलमुत्राने ओथंबून वहात आहेत. याची तक्रार करून सुध्दा समस्या जैसे थे असल्याचे पाहून नगरसेवक विकास घरत आक्रमक झाले. रहिवाशांच्या सह थेट सिडको कार्यालयात धडक देत त्यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेताच कामे मार्गी लागली आहेत.

त्यानंतर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नगरसेवक विकास घरत म्हणाले की, सांड पाण्याच्या टाक्या सेक्टर ३४ परिसरात वाहत असल्याने अतिशय दुर्गंधी पसरलेली आहे. त्यावर घोंगावणाऱ्या माशा आणि २४ तास वाहणारे सांडपाणी यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हेच पाणी पिण्याच्या पाण्यात देखील मिसळते त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय येथील चेंबर वरची झाकणे नाहीशी झाली आहेत, पदपथ अपूर्ण अवस्थेत आहेत. अशा सगळ्या समस्यांसाठी नागरिकांनी तक्रारी करून, आम्ही पाठपुरावा करून देखील कामे होत नसतील तर मला रुद्रावतार धारण करावा लागेल. आज येथील समस्याग्रस्त नागरिकांना घेऊन मी कामोठे सिडको कम्युनिटी सेंटरमध्ये कार्यकारी अभियंता विलास बनकर यांची भेट घेतली. आठ दिवसात नवीन पाईप टाकण्याचे काम सुरू होईल. तोपर्यंत जेट मशीन, आणि सक्शन मशीन द्वारे टाक्या साफ केल्या जातील.

> सगळ्या समस्या जर का कूर्मगतीने सुटत असतील तर याला सिडको आणि पनवेल महानगरपालिका प्रशासन दोघेही तितकेच जबाबदार आहेत. २०१७ मध्ये पनवेल महानगरपालिका आणि सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यामुळे प्रशासनाला येथील समस्यांची पुरेपूर जाण आहे. परंतु हस्तांतरण प्रक्रियेमध्ये आणि लाल फितीमध्ये जर का समस्या जशाच्या तशा राहणार असतील तर लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही ते कधीही सहन करणार नाही. माझे असे ठाम सांगणे आहे की सिडकोने प्रथम सर्व सेवा सुविधा दोषमुक्त कराव्यात, आणि मगच पनवेल महनगर पालिकेला हस्तांतरीत कराव्यात.

घरत पुढे म्हणाले की, खरे तर या समस्या आणि या व्यतिरिक्त अन्य भेडसावणारे प्रश्न यासाठी आम्ही सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पंधरा दिवसापूर्वी अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली. परंतु अधिकाऱ्यांच्या बरोबर झालेल्या बैठकीतून जर प्रश्न सुटणार नसतील तर आम्हाला आक्रमक व्हावे लागेल. ठेकेदार जर कामे करत नसतील तर त्यांच्यावरती अंकुश ठेवण्याची जबाबदारी सिडको अधिकाऱ्यांची आहे. परंतु बहुतांश वेळेला जर समस्या निर्माण झाल्या तर ठेकेदार यांच्यासोबत नागरिक आणि आम्ही लोकप्रतिनिधी यांचे वाद होत असतात.

कार्यकारी अभियंता बनकर यांनी पाईपलाईन बदलण्याचे कामाचे बाबत प्रशासकीय मंजुरी आलेली असून आठ दिवसात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन काम सुरू होईल असे आश्वासन दिले. तसेच मेनहोल वरती फ्रेम व झाकण बसवण्याचे काम तातडीने सुरू होईल असे देखील सांगितले. यावेळी नगरसेवक विकास घरत यांच्यासमवेत नगरसेवक डॉक्टर अरुण भगत व सेक्टर ३४ मधील रहिवासी उपस्थित होते.

## नातू झाला तरी सासरी छळ सुरूच, महिलांसह नातेवाईकांवर होतो अनिष्ट परिणाम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपण एकविसाव्या शतकात असलो, तरी महिलांवरील अत्याचारांमध्ये आणि अन्यायामध्ये दिवसेंदिवस वाढच होताना दिसते आहे. त्यामुळे अनेकदा महिलेला कायदयाचा आधार घेऊन पति, सासु सासरे नणंद, दिर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा लागतो.

शिक्षणाचा दर्जा वाढला आणि आधुनिकतेचा काळ आला तरी विवाहितेचे छळ मात्र कमी झाले नाहीत. एकविसाव्या शतकातही महिलांची पिळवणूक आणि छळ होत आहे, हे दुर्दैव आहे.

अनेक महिला पती त्याना दारू पिऊन मारहाण, शिवीगाळ करतात. महिलेचा मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे अशा तक्रारी करतात. छोट्या मोठ्या गोष्टीतून पती पत्नीमध्ये खटते उडत असतात. पती पत्नीमध्ये अनेकदा मोबाइलमुळे वाद होत आहेत. दोघेही एकमेकांवर शंका घेतात. त्यामुळे हे शंकेचे काहूर संसाराची राखरांगोळी करत असते. परंतु हा वाद इतका टोकाचा बनतो की, विवाहितेला घरातून बेदखल केले जाते. एवढेच नव्हे तर नातू झाला तरी सासरी छळ सुरूच असतात. विशेषत: हे प्रकार ग्रामीण भागामध्ये सर्वाधिक घडत असल्याचे समोर आले आहे.

पनवेल, उरण परिसरात कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून लॉकडाऊन सुरू आहे. त्यामुळे अशाप्रकारच्या जास्त तक्रारी दाखल झाल्या नाहीत. परिमंडळ २ मध्ये पनवेल शहर, तालुका, खांदेश्वर, खारघर, तळोजे, कलंबोली, कामोठे, उरण, न्हावाशेवा, मोरा या दहा पोलीस स्टेशनचा समावेश होतो. २०२० या वर्षभरात परिमंडळ २ च्या दहा पोलीस स्टेशनमध्ये ४२ गुन्हे दाखल झाले आहेत. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर तक्रारींचा ओघ वाढला होता. २०२१ मे पर्यंत २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर अन्याय, अत्याचाराच्या काही तक्रारी दाखल झाल्या होत्या, यातील काही तक्रारी सामोपचाराने मिटल्या आहेत.

## नेरळ पोलिसांकडून गावठी दारू भट्ट्या उद्ध्वस्त

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ जवळील बेकरे गावात पोलिसांनी गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर धडक कारवाई केली आहे. यात अनेक भट्ट्या पोलिसांकडून उद्ध्वस्त करण्यात आल्या असून पोलिसांनी हातभट्ट्यांवर केलेली हि सर्वात मोठी कारवाई आहे. या कारवाईत सुमारे पाच लाख ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



नेरळ पोलीस ठाणे हद्दीत बेकरे येथील जंगलात गावठी हातभट्ट्या मोठ्या प्रमाणात लावले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी या जंगलात शोध घेतला असता त्यांना जंगलात वेगवेगळ्या ठिकाणी १५ लिटरच्या प्लॅस्टिकच्या कॅन मध्ये १५ लिटर गावठी दारू, २५ हजार रुपयांची ऍक्टिव्हा गाडी, २०० लिटरच्या १५ टाक्यांमध्ये एकूण २२५० लिटर नवसागर गूळ मिश्रित रसायन, एक मोठी पत्र्याची टाकी, काळ्या गुळाची पावडर नवसागरच्या वड्या व वजन काटा यात काळा गुळ पावडर साधारण ३० किलोच्या ४०० पिशव्यांपर्यंत आहे म्हणजे अंदाजे १२ हजार किलो मिळून आला आहे. या सर्व मुद्देमालाची किंमत हि पाच लाख ७६ हजारांपर्यंत आहे. त्यामुळे हि सर्वात मोठी कारवाई असल्याचे समजते.

या कारवाईमध्ये योगेश धोंडू कराळे, जनार्दन दत्तात्रेय कराळे, मोहन श्रीराम मसने यांना अटक करण्यात आली असून रामदास मंगल कराळे यांचा पोलीस शोध घेत आहेत. तर याबाबत अधिक तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक एम.व्ही. कदम हे करीत आहेत. पोलिसांच्या या धडक कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत

## नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशनतर्फे विशेष मुलांच्या शाळेतल्या मुलांना देण्यात येणार मोबाईल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपण अनेकदा मोबाईलचे एखादे नवीन मॉडेल बाजारात आले की ते विकत घेतो. अशावेळी आपण जुन्या मोबाईलचे काय करतो? जर आपल्यापैकी कोणाकडे असे जुने पण चांगल्या अवस्थेतले मोबाईल फोन असतील तर तुम्ही ते दान देऊ इच्छिता का? नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशन नवीन पनवेल तर्फे चालवण्यात येणाऱ्या विशेष मुलांच्या शाळेतल्या काही मुलांना केवळ मोबाईल घेण्याची ऐपत नसल्याने शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. त्यांना मोबाईल देण्यात येणार आहेत.

यासाठी त्यांनी आवाहन केले आहे की, तुमच्याकडे वापरत असलेला जुना मोबाईल फोन फेकून न देता तो या संस्थेला द्यावा. तसेच त्या मोबाईलचा चार्जरही द्यावा. यासाठी १) नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशन ट्रस्ट संचलित अक्षम बौद्धिक मुलांची शाळा, प्लॉट नंबर १३७, सेक्टर १/एस. शबरी हॉटेलजवळ, नवीन पनवेल सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते दुपारी ३ किंवा डॉ. समिधा ययाती गांधी १/२, बी, केशव वसंत, जुन्या तहसीलदार ऑफिससमोर, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल येथे सकाळी दहा ते बारा आणि सायंकाळी पाच ते सात सोमवार ते शुक्रवार संपर्क साधावा. भ्रमणध्वनी ०२२२७४५७२०३, ९८२०१३८६०५.

# फणसाड-कर्नाळा अभयारण्यात भटकंतीसाठी युवक-युवतींमधून तयार होणार टुरिस्ट गाईड

## पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नांतून स्थानिकांना रोजगार होणार उपलब्ध

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्यास पर्यटक, पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमी यांची कायम पसंती असते. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली, अभ्यास दौरे या दोन्ही पर्यटनस्थळी आयोजित होत असतात. येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांविषयीची माहिती व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, अशी पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांची संकल्पना होती. त्यानुसार भारत सरकारचा ऑनलाईन पर्यटन सुलभ मार्गदर्शक हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी महाराष्ट्र शासनाने अधिकृतरित्या प्रमाणित करून सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील फणसाड व कर्नाळा अभयारण्य येथील एकूण ३१ आदिवासी स्थानिक युवक-युवतींना टुरिस्ट गाईड प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यासाठी येणाऱ्या रु.३ लक्ष ६६ हजार ५०० इतक्या खर्चास शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे.




कर्नाळा व फणसाड अभयारण्यात पायाभूत सोयी-सुविधांमध्ये गाईड नेमण्याबाबत निर्देश पर्यटन विभागास दिले होते. त्यानुषंगाने राज्याच्या पर्यटन विभागाकडून स्थानिक युवक-युवतींना मार्गदर्शक होण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पर्यटन व वन विभागामार्फत देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी आवश्यक निधीस शासनाने मंजूरी दिली आहे. यामुळे स्थानिकांना, तरुणांना मार्गदर्शकाच्या व्यवसायातून रोजगार मिळणार असून पर्यटकांनाही सुविधा उपलब्ध होणार आहे.

रायगड जिल्हास मिळालेले वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्य, अद्वितीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यामुळे या जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांचा ओघ अधिकाधिक आहे. फणसाड व कर्नाळा अभयारण्य इथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला एक समृध्द व आल्हाददायक अनुभव देण्याचा पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना. कु.आदिती तटकरे यांचा प्रयत्न आहे. भटकंती, प्रवास हा फक्त एक छंद म्हणून न जोपासता त्याला एक शैक्षणिक आणि व्यावसायिक जोड देण्याचा विचार करणाऱ्या राज्यातील इच्छुक उमेदवारांसाठी पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण ही संकल्पना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पर्यटनाची आवड असणाऱ्या होतकरु उमेदवारांना पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित टुरिस्ट गाईड तयार करण्यात येणार आहे.

कर्नाळा व फणसाड अभयारण्य येथील वनक्षेत्र परिसरातील वनसंवर्धन पर्यटनस्थळे अधिक विकसित करण्याच्या दृष्टीने पर्यटन राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.कु. आदिती तटकरे यांनी पाठपुरावा केला होता. या पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी इथे राहण्याच्या सोयी-सुविधा देखील उपलब्ध करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागास दिल्या आहेत. यामुळेही येथील स्थानिकांना रोजगार मिळणार आहे.

# पोलिस पाटील यांच्या मागण्याबाबत शासन सकारात्मक : गृहराज्यमंत्री शंभुराजे देसाई

दै.रायगड नगरी । मुंबई

गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणारा महत्वपूर्ण घटक हा पोलिस पाटील होय. कोरोना काळात पोलिस पाटील यांनी फ्रंटलाईन वर्कर म्हणून कौतुकास्पद कार्य केले आहे, पोलिस पाटील यांच्या विविध मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे त्यावर गृह विभागाने त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश गृह राज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराजे देसाई यांनी दिले.



मंत्रालयात गृहराज्यमंत्री श्री.देसाई यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील पोलिस पाटील यांच्या विविध मागण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी पोलिस महासंचालक संजय पांडे, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्री.देसाई म्हणाले, पोलिस पाटील यांनी कोरोना कालावधीत अत्यंत जबाबदारीने फ्रंट लाईन वर्कर म्हणून काम केले आहे. गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ही पोलिस पाटलांची असते. कोरोना काळात काळात पोलिस पाटलांनी कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी खूप चांगल्या पध्दतीने पार पाडली असून या कामाचे कौतुकही श्री. देसाई या बैठकीदरम्यान केले.

पोलिस पाटलांच्या विविध मागण्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. पोलिस पाटलांच्या मानधनात वाढ करणे, शासनातर्फे विमा योजना सुरू करणे, निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करणे, निवृत्तीनंतर ठोस रक्कम अथवा पेन्शन मिळणे, अनुकंपा तत्व लागू करणे, कर्तव्य बजावत असताना शहीद झालेल्या पोलिस पाटलांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये नुकसानभरपाई देणे व सरकारी सेवेत सामावून घेणे, शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता, प्रशिक्षण व इतर योजनांची अंमलबजावणी करणे, इतर गावांचा अतिरिक्त कार्यभार दिल्यास त्याचा अतिरिक्त भत्ता मिळावा, पोलिस पाटील कोव्हीड काळात मृत्युमुखी पडल्यास शासन निर्णयानुसार ५० लाख रुपये भरपाई मिळावी या प्रमुख दहा मागण्यांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली. गृह विभागाने या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेवून कार्यवाही करावी असे यावेळी गृहराज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी सांगितले.

## सुधागड-पाली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र दहिगावसाठी शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील अगदी ग्रामीण स्तरापर्यंतची आरोग्य यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. अनेक वर्षांपासून मंजूर झालेल्या आरोग्य केंद्रांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही प्रलंबितच होती. मात्र पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत आरोग्य केंद्रांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून आरोग्य केंद्रे कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सुधागड- पाली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दहिगाव या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मौजे दहिगाव, ता.सुधागड, जि. रायगड येथील स.नं.११३/५, क्षेत्र ०-६४-० हे.आर. पैकी ०-०५-०० हे.आर. ही जमीन या मसणवटा म्हणून निहीत असलेल्या शासकीय मिळकती भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने ही शासकीय जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दहिगाव करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत. सुधागड- पाली तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.